रयत शिक्षण संस्थेचे.

**चंद्राबाई-शांताप्पा शेडुरे कॉलेज हुपरी.ता. हातकणंगले,जि.कोल्हापूर .**

**शिवाजी विद्यापीठ,कोल्हापूर अंतर्गत आंतरविभागीय क्रॉसकंट्री स्पर्धा (मुले /मुली)-२०२५-२६.**

शिवाजी विद्यापीठ,कोल्हापूर अंतर्गत आंतरविभागीय क्रॉसकंट्री स्पर्धा (मुले /मुली)-२०२५-२६. स्पर्धेचे आयोजन आमच्या रयत शिक्षण संस्थेच्या चंद्राबाई-शांताप्पा शेडूरे कॉलेज हुपरी. यांच्याकडे होते. सदर स्पर्धा चंद्राबाई-शांत्ताप्पा शेंडुरे कॉलेज, हुपरी.येथे पर पडल्या या स्पर्धेत मुलांच्या मध्ये विलिंग्डन कॉलेज सांगलीचा श्री. चैतन्य रुपणार तर मुलींच्यात न्यू कॉलेजची कु. सृष्टी रेडेकर यांनी प्रथम क्रमांक पटकावला. या स्पर्धेत एकूण ६० पुरुष व ४० महिला खेळाडूंचा समावेश होता.या स्पर्धेतून शिवाजी विद्यापीठाचा ६ मुले वा ६ मुलींचा संघ निवडण्यात आला. यामध्ये अभिषेक देवकाते,नाईट कॉलेज, कोल्हापूर.,अभिनंदन सूर्यवंशी के. डब्लू. सी. कॉलेज, सांगली. प्रवीण कांबळे, शाहू कॉलेज, कोल्हापूर. हणमंत ब्याडगी, डॉ. पतंगराव कदम कॉलेज,सांगलीवाडी.सुमंत राजभर, एन. डी. नाईट कॉलेज, सांगली तर मुलींच्यामध्ये कु. संतोषी नरळे,डी. पी. भोसले कॉलेज कोरेगाव. कु. प्रणाली मंडले प्रा. शरद पाटील महाविद्यालय मिरज ,कु.शीतल मोहिते मातोश्री बयाबाई श्रीपतराव कदम महाविद्यालय कडेगाव,कु. तनुजा माळी डॉ.वसंतदादा पाटील महाविद्यालय तासगाव,कु. आरती बाबर . डी. पी. भोसले कॉलेज कोरेगाव या खेळाडूंचा समावेश आहे. या स्पर्धेत मुलांची जनरल चॅम्पियनशिप भाई. टी के. कोलेकर कॉलेज नेसरी तर मुलीची जनरल चॅम्पियनशिप रयत शिक्षण संस्थेच्या डी.पी. भोसले कॉलेज कोरेगाव यांनी संपादन केली.

स्पर्धेची सुरवात श्री.मंगळराव माळगे, नगराध्यक्ष, हुपरी नगर परिषद व प्रकाश रणदिवे उपनगराध्यक्ष हुपरी नगरपरिषद तसेच शिवराज नाईक यांच्या शुभहस्ते करण्यात आली. तर पारितोषिक वितरण समारंभ श्री. प्रकाश रणदिवे उपनगराध्यक्ष व अजितकुमार पाटील, सदस्य, महाविद्यालय विकास समिति यांच्या हस्ते संपन्न झाला . याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए. सी. शिंदे , उपप्राचार्य बी. बी. जाधव, स्पर्धा निवड समिती चेअरमन डॉ. कांचन बेल्लद ,सदस्य योगेश मांगोरे पाटील व प्रमोद चव्हाण ,रामा पाटील,विविध महाविद्यालयाचे क्रीडा संचालक उपस्थित होते.महाविद्यालयातील शिक्षक,शिक्षकेतर कर्मचारी,विद्यार्थी यांच्या मदतीने स्पर्धेचे उत्कृष्ठ आयोजन करण्यात आले.स्पर्धा संयोजन सचिव डॉ.इब्राहिम मुल्ला यांनी प्रास्ताविक व स्पर्धेचे उत्तम नियोजन केले. तर सूत्रसंचालन डॉ. संध्या माने यांनी केले.या प्रसंगी महाविद्यालयविकास समिति ,महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अरुण शिंदे, शिक्षक,शिक्षकेतर कर्मचारी,विद्यार्थी यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

Chandrabai-Shantappa Shendure College, Hupari. HUPARI

प्राचार्य,
चंद्राबाई-शांताप्पा शेंडुरे कॉलेज
हुपरी